"नॉर्थ कॅनरा जी. एस्. बी. वृत्तविलास"
दि नॉर्थ कॅनरा गौड सारस्वत ब्राह्मण संघाची त्रैमासिक

# मुखपत्रिका

कार्यालय फोन : २३८७७३०१, २३८८००७३
WEB SITE : http://www.nkgsbsangh.org
E-MAIL : nkgsbs@gmail.com
कार्यालयीन वेळ : दुपारी ३ ते ७ (शनिवारी ३ ते ५)

॥ किं जीवितेन पुरुषस्य निरक्षरेण ॥

परस्परम् भावयन्तः श्रेयः परमवाप्स्यथ

मूल्य रु. ५

| | | |
|---|---|---|
| क्रमांक ३ | वर्ष : ३७ | ऑक्टोबर-डिसेंबर २०१५ |

**BOOK PACKET (PERIODICAL)**
Regd. with Registrar of Newspaper of India, Reg. No. RN37436/80

**TO,**

**From :** The NKGSB Sangh, Laxmi Sadan, 361, V.P. Road, Mumbai - 400 004.

# दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी.संघ आणि
# दि नॉर्थ कॅनरा जी.एस.बी.इंडस्ट्रीयल अँड एज्यु. सोसायटी
# वार्षिक स्नेहसंमेलन - २०१५

## निमंत्रण पत्रिका

ज्ञातीतील सर्व बंधुभगिनींना नम्र विनंती आहे की आपण सर्वांनी ज्ञातीच्या येत्या वार्षिक स्नेहसंमेलनास उपस्थित राहून शोभा आणावी व कार्यक्रम यशस्वी करण्यास साहाय्य करावे.

प्रमुख पाहुणे : वैद्य शैलेश दामोदर नाडकर्णी, आयुर्वेद तज्ज्ञ

स्थळ : डॉ. अंटोनिओ डिसिल्व्हा ट्रस्ट हॉल, कबुतरखाना, दादर.

दिनांक : रविवार २२ नोव्हेंबर २०१५, सायं. ४.१५ वाजता

## कार्यक्रम

- स्वागत गीत
- संघ व एज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षांची भाषणे
- प्रमुख पाहुण्यांचे मनोगत
- विशेष सत्कार : श्रीमती मृदुला भांडारकर
  गेली २५ वर्षे उभय संस्थांचे कार्यालय
  समर्थपणे सांभाळल्याबद्दल.
  (तपशील गेल्या अंकात ' संपादकीय ' मध्ये)
- **मध्यंतर**
- विवाहाची सुवर्णजयंती ओलांडणाऱ्या जोडप्यांचा व ७५ वयोमर्यादा ओलांडणाऱ्या व्यक्तींचा सत्कार.
- कवळेंमठ संस्कृत पाठांतर स्पर्धेतील विजेत्यांना व एज्यु. सोसायटीतर्फे गुणवत्ताधारक विद्यार्थ्यांना वैद्य देवकी नाडकर्णी यांच्या हस्ते बक्षिसे.

स्नेह संमेलनासाठी वेगळे निमंत्रण पाठविले जाणार नाही
याची कृपया नोंद घ्यावी.

**प्रेमानंद शं. नाडकर्णी**
कार्याध्यक्ष - संघ

**देवदास अ. नाडकर्णी**
कार्याध्यक्ष - एज्युकेशन सोसायटी

# संपादकीय

## आगामी स्नेहसंमेलनाचे प्रमुख पाहुणे

## आयुर्वेद तज्ज्ञ वैद्य शैलेश नाडकर्णी

गेल्या सप्टेंबर महिन्यात **लोकसत्ता** या दैनिकातर्फे ठाणे येथे **लोकसत्ता आरोग्यमान भव** हा परिसंवाद भरविण्यात आला होता. त्यात विविध क्षेत्रांतील ज्या अनुभवी तज्ज्ञ वक्त्यांचा समावेश होता त्यातील एक म्हणजे जागतिक स्तरावरील आयुर्वेद तज्ज्ञ वैद्य शैलेश दामोदर नाडकर्णी. हीच त्यांच्या कर्तबगारीची व लोकप्रियतेची पावती. २२ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या वार्षिक स्नेह संमेलनाचे प्रमुख पाहुणे म्हणून त्यांनाच निमंत्रित करण्यात आले आहे. त्यांचा हा अल्प परिचय.

बॉम्बेसेन्ट्रल जवळील **सेन्ट्रल क्लिनीकल लॅब** चे संचालक दिवंगत दामोदर शांताराम नाडकर्णी (सांवरपै) यांचे शैलेश हे पुत्र. शालेय जीवनापासून त्यांच्या अष्टपैलू कर्तृत्वाचा आलेख चढताच राहिला. १९७४ साली आर्यन हायस्कूलचा सर्वोत्तम विद्यार्थी म्हणून त्यांना डॉ. साठे पारितोषिक मिळाले होते. सारस्वत दीनवत्सल संघातर्फे योजल्या जाणाऱ्या वक्तृत्व स्पर्धेत लागोपाठ तीन वर्षे प्रथम क्रमांक मिळविण्याची त्यांनी हॅट्रीक साधली होती तर शिवराय मंडळाच्या अखिल महाराष्ट्र निबंध स्पर्धेत त्यांना प्रथम पुरस्कार मिळाला होता. याच शिदोरीचा त्यांना आयुष्यभर उपयोग झाला.


बी.एस्सी. झाल्यावर त्यांनी शीव येथील आयुर्वेद महाविद्यालयात प्रवेश घेतला. १९८२ साली बी.ए.एम्.एस या पदवी परीक्षेत मुंबई विद्यापीठात ते सर्वप्रथम आले. एम्.डी. (आयुर्वेद) या परीक्षेतही त्यांनी पहिला क्रमांक पटकावला. ते सध्या **धूतपापेश्वर** या शंभरी पार पाडलेल्या सर्वांत जुन्या औषध निर्मितीच्या कंपनीत सल्लागार म्हणून काम करतात. त्याशिवाय ते जिथे शिकले त्याच शीव येथील महाविद्यालयात मानद प्राध्यापक म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. श्रीलंका, जर्मनी येथेही ते व्हिजीटींग प्राध्यापक म्हणून जातात. आयुर्वेद संबंधित अनेक शासकीय व निमशासकीय मंडळांवर सल्लागार म्हणून ते काम करतात. बऱ्याच विद्यापीठांत त्यांना परीक्षक म्हणून पाचारण करण्यांत येते. तसेच देशविदेशांत होणाऱ्या आयुर्वेदसंबंधी परिषदांमध्ये व्याख्यान देण्यासाठी वा मार्गदर्शन करण्यासाठी त्यांना निमंत्रित केले जाते.

**काया चिकित्सा** या विषयात त्यांचे खास प्रावीण्य. शिवाय औषधातील मूल घटकांच्या प्रमाणांचे स्टँडर्डायझेशन या क्षेत्रांत त्यांचे योगदान लक्षणीय आहे. २००७ साली प्रतिष्ठेचा समजला जाणारा कोल्हटकर संशोधन पुरस्कार त्यांना मिळाला होता. निरोगी जीवनासाठी वाहलेल्या 'आरोग्ययात्री' या दिवाळी विशेषांकाचे ते गेली कित्येक वर्षे संपादन करतात.

वैद्य शैलेश यांच्या सुविद्य पत्नी वैद्य देवकी (एम्.डी.आयुर्वेद) यासुध्दा आयुर्वेदात प्रवीण असून एका महाविद्यालयात अध्यापन करतात.

१ ऑक्टोबर २०१५

द.ना.नाडकर्णी



# संघाचा सहस्रपूर्णचंद्रदर्शन समारंभ

## जोगेश्वरी येथील रामेश्वर मंदीर येथे



## निमंत्रण पत्रिका

आपल्या संघाची स्थापना **१० नोव्हेंबर १९३५** रोजी झाली होती. तो शुभदिन म्हणजे **कार्तिकी पौर्णिमा** म्हणजेच **त्रिपुरारी पौर्णिमा** हा होता. संघाच्या यशस्वी कारकिर्दीला **बुधवार २५ नोव्हेंबर** रोजी **त्रिपुरारी पौर्णिमेच्या** दिवशी **८० वर्षे** पूर्ण होतात. तेव्हा सहस्रपूर्णचंद्रदर्शनाच्या निमित्ताने मुंबई येथील प्रतिमंगेशी समजल्या जाणाऱ्या जोगेश्वरी येथील रामेश्वर मंदिरात ज्ञातिबांधवांच्या कल्याणाप्रीत्यर्थ संघातर्फे गाऱ्हाणे घालण्यात येईल.

त्रिपुरारी पौर्णिमेला श्रीमंगेशीप्रमाणे श्रीरामेश्वर मंदिरातही पणत्यांची नेत्रदीपक दीपाराधना करण्यात येते. एकंदर थाट श्रीमंगेशीसारखाच अवर्णनीय असतो. रात्रौ ९ वाजता देवालयाभोवती पालखीची मिरवणूक निघते. नंतर आरती व तीर्थप्रसाद झाल्यावर उत्सवाची सांगता होते. सर्व ज्ञातिबांधवांनी हेच निमंत्रण समजून या शुभप्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे व कार्याला शोभा आणावी.

## कार्यक्रम - दिनांक बुधवार २५ नोव्हेंबर २०१५

स्थळ : श्री रामेश्वर मंदिर, सरस्वती बाग, जोगेश्वरी (पू.)
वेळ : रात्रौ ९.००
कार्यक्रम : श्रींची पालखीतून मिरवणूक, आरती, संघातर्फे गाऱ्हाणे, तीर्थप्रसाद

**प्रेमानंद नाडकर्णी,** कार्याध्यक्ष

## ठाणे मंचतर्फे एक दिवसाची सहल

**दिनांक :** रविवार १७ जानेवारी
**प्रस्थान :** माहीम, मुलुंड, ठाणे
**आकार :** रु. ४५० (आपल्या बँकेच्या नौपाडा शाखा, खाते १८१६ मध्ये भरण्याची सोय.)
**स्थळ :** अद्याप ठरलेले नाही. डिसेंबर महिन्यात संपर्क साधावा.

| **सुरेश पालेकर** | **मंजिरी कुलकर्णी** | **राजू बोरकर** |
|---|---|---|
| ९९६९४५५३७० | ९९६५०९८११७ | ९८२०९१७८४१ |

# प्रकाशझोत

## सौ. गायत्री (शीतल) वागळे रांगणेकर हिला अमेरिकेतील बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या बोधचिन्ह स्पर्धेत पहिले पारितोषिक.

अमेरिका खंडात स्थायिक झालेल्या मराठी भाषिकांचे दर दोन वर्षांनी **बृहन्महाराष्ट्र मंडळ** या शिखर संस्थेतर्फे एक अधिवेशन भरते. यंदा हे अधिवेशन जुलैच्या पहिल्या आठवड्यात लॉस एंजेलीस येथे भरले होते. त्याला ४००० रसिक उपस्थित होते. अधिवेशनाची मुख्य संकल्पना **मैत्र पिढ्यांची** अशी होती, ६०च्या दशकात आलेली पहिली पिढी, उच्च शिक्षणासाठी आलेली दुसरी पिढी, अमेरिकेतच जन्मलेली व वाढलेली तिसरी पिढी या तिन्ही पिढ्यांचा सातासमुद्रापार जपलेल्या संस्कृतीचा उत्सव. त्यासाठी बोधचिन्ह स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. त्यासाठी शंभर स्पर्धकांनी भाग घेतला. सगळेच उच्च शिक्षित. त्यांत शांतीनगर, माहीम, येथील श्री. अरुण वागळे यांची लॉस एंजेलिस येथे स्थायिक झालेली कन्या शीतल, (विवाहानंतर सौ. गायत्री रांगणेकर.) हिने सादर केलेल्या अतिशय कल्पक अशा बोधचिन्हाची निवड झाली. त्याशिवाय शीतलने अधिवेशनासाठी जाहिराती, फलक, सजावट अशा अनेक महत्वाच्या जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडल्या.

## एका अनोखी पाकस्पर्धेत सौ. विद्या वागळे यांना तृतीय पारितोषिक

**महाराष्ट्र टाईम्स सिलेब्रेटिंग श्रावण** अंतर्गत **फ्रुट पंच** ही अनोखी पाकस्पर्धा गेल्या ऑगस्ट मध्ये दादर येथे आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत विरार, कल्याणपर्यंतच्या उत्साही सुगृहिणींनी भाग घेतला होता. तसेच सर्व वयोगटांतल्या व विविध व्यवसायातल्या अन्नपूर्णांनी हजेरी लावली होती. केवळ फळांवर आधारित पाककृतींचे एक आगळेवेगळे साम्राज्य फार मनोहारी होते. या स्पर्धेत माहीम येथील सौ. विद्या (माधुरी) मोहन वागळे यांच्या ‘ तिरंगी फ्रुट फज ’ या पाककृतीला तृतीय पारितोषक मिळाले.

## कु. करण मुझुमदार महाराष्ट्र शासनाच्या MHCET प्रवेश परीक्षेत गुणवत्ता यादीत उत्तीर्ण

वांद्रे येथील कु. करण दत्तात्रय मुझुमदार हा बारावी नंतरच्या महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षणासंबंधीच्या **MHCET** या प्रवेश परीक्षेत यंदा गुणवत्ता यादीत उत्तीर्ण झाला. नायर हॉस्पिटलशी संलग्न असलेल्या टोपीवाला नॅशनल मेडीकल कॉलेजमध्ये त्याला MBBS साठी प्रवेश मिळाला आहे. न्युरोसर्जरी विषयातील तज्ज्ञ व त्या विषयाचे जी. एस्. मेडीकल कॉलेजमधील प्राध्यापक डॉ. दत्तात्रय प्रकाश मुझुमदार यांचा करण हा मुलगा होय.

## आपल्या बँकेला सर्वोत्कृष्टतेचा पुरस्कार

१५०० कोटी रुपयांपेक्षा अधिक व्यवसायाच्या वर्गवारीतील २०१३-१४ वर्षातील सर्वोत्कृष्ट बँक म्हणून बृहन्मुंबई नागरी सहकारी बँक्स असोसिएशन तर्फे आपल्या बँकेची निवड करण्यात आली. १२ ऑगस्ट रोजी झालेल्या एका खास समारंभात पुरस्काराचे वितरण करण्यात आले. बहुराज्य शाखा विस्तार असलेल्या आपल्या बँकेचे वर्षअखेर शाखांचे शतक गाठण्याचे उद्दिष्ट आहे.

## वार्षिक कवळेंमठ संस्कृत पाठांतर स्पर्धेचे विजेते

कैवल्यपूर मठाधीशांच्या आशीर्वादाने यंदाही ४ ऑक्टोबर रोजी विद्यार्थ्यांसाठी संस्कृत पाठांतर स्पर्धा घेण्यांत आली. सर्वप्रथम संघाचे अध्यक्ष श्री. प्रेमानंद नाडकर्णी यांच्या हस्ते दीप प्रज्वलन झाले. स्पर्धेचे सूत्रसंचालन संघाचे कार्यवाह श्री. सुभाष कसबेकर यांनी केले व स्पर्धेचे उद्दिष्ट व पाठांतरासाठी गुण देण्याचे निकष त्यांनी विशद करुन सांगितले. त्या पश्चात मुखपत्रिकेच्या गेल्या अंकात नमूद केल्याप्रमाणे शिशु व कुमार गटातल्या स्पर्धकांचे श्लोकपठण झाले. मध्यंतरानंतर सर्व स्पर्धकांना श्रीमती कुसुम विश्वेश वागळे स्मृती निधीतून रोख भेटी देण्यात आल्या. निकाल जाहीर करण्यापूर्वी परीक्षकांतर्फे श्रीमती श्रीमती सुषमा पौडवाल यांनी स्पर्धकांना योग्य ते मार्गदर्शन केले.

### विजेत्यांची नांवे

### शिशुगट (६ वर्षाखालील)

१. अयान गिरीश तेलंग, माहीम ★ २. अवधूत महेश्वर वागळे, खार

### शिशुगट (६ वर्षावरील)

१. ऋतुजा मंगेश धुमे, दादर ★ २. निनाद नीलेश वागळे, अंधेरी
३. शर्वणी शैलेश फेणाणी, दादर

### कुमार गट

१. शुभन सचिन तेलंग, गावदेवी. ★★ २. अमेय मंदार पंडित, पारले
३. अमेय उल्हास नेत्रावळी, पारले

**उत्तेजनार्थ** : मिहीर किरण वागळे, अंधेरी

★ दिनकर लक्ष्मण कुलकर्णी व शिवानंद मंगेश वाघ स्मृतीप्रीत्यर्थ ठेवलेली पारितोषिके या विजेत्यांना मिळाली.

★★ आनंद गणपती वर्टी स्मृतीप्रीत्यर्थ ठेवलेले पारितोषिक या विजेत्याला मिळाले.

# आता तुम्हीच ठरवा– अशा प्रसंगी आम्ही काय करणे आवश्यक होते?

१. माझ्या अंदाजाप्रमाणे खालील प्रसंग १९६० साली घडलेला असावा. त्यावेळी मी कॉलेजमध्ये असताना मला घरून फक्त दरमहा रु.२० पॉकेटमनी मिळत असे. त्याकाळात संगीतकार शंकर–जयकिशन अगदी टॉपवर होते. त्यांचा एक **LIVE** प्रोग्राम बिर्ला मातोश्री सभागृहात होणार होता. मी माझा मित्र अशोक वालावलकर दोघेही तो कार्यक्रम पहाण्यास अतिशय उत्सुक होतो. पण सर्वात कमीत कमी तिकिट होते रु. ५० म्हणजे माझा अडीच महिन्याचा पॉकेटमनी! अशोकची सांपत्तीक स्थितीही काही माझ्यापेक्षा वेगळी नव्हती पण कार्यक्रम बघण्यासाठी आम्ही काहीही करायला तयार होतो.

**आता तुम्हीच ठरवा– अशा प्रसंगी आम्ही काय करणे आवश्यक होते?**
**आता आम्ही काय केले ते सांगतो–**

कार्यक्रम संध्याकाळी सात वाजता सुरु होणार होता व आम्ही दोघे पाच वाजल्यापासूनच सभागृहाबाहेर रेंगाळत होतो. सुमारे साडेपाच दरम्यान एक बस कलाकारांना घेऊन सभागृहासमोर आली. आम्ही ताबडतोब पुढे सरसावलो. मी त्यांची एक हार्मोनियमची पेटी खांद्यावर घेतली व अशोकने एक तबल्याचा जोड उचलला व दोघेही कलाकारांसोबत सभागृहाच्या विंगमध्ये गेलो. आयोजकांना वाटले आम्ही कलाकारांची माणसं आहोत व कलाकारआम्हाला आयोजकांची माणसे समजली. संपूर्ण प्रोग्राम आम्ही विंगेमधूनच बघितला–अगदी जवळून. आयोजकानी खास कलाकारांकरीता चहा – बटाटेवड्याची सोय केली होती. आम्ही सर्वांना आग्रहाने चहा बटाटेवडे पुरवत होतो व सोबत आम्ही सुद्धा त्याचा भरपूर आस्वाद घेत होतो. कार्यक्रमाच्या शेवटी आयोजकांच्या सत्काराला उत्तर देताना संगीतकार शंकरजींनीही त्यांचे आभार मानले – खास करून कलाकारांची चांगली बडदास्त ठेवण्यासाठी दोन व्हॉलेंटिअर्स पुरविल्याबद्दल. आम्ही हळूच तिथून सटकलो हे सांगण्याची आवश्यकता नाही.

२. तब्बल २० वर्षांनंतर हाच माझा मित्र अशोक वालावलकर अचानक सिंगापूर एअरपोर्टवर भेटला. आम्ही कडकडून एकमेकांना भेटलो. अशोक **IAS Officer** झाला होता व **Director of Shipping** च्या पदावर होता. मी **Indian Iron & Steel Co.Ltd. (Martin Burn Ltd. Group)** मध्ये मोठ्या हुद्यावर होतो हे कळताच त्याने मला एक भंगार ७००० टनाची ग्रीक शिप तोडण्याकरीता रु २ प्रति किलोग्रॅम दराने कॉन्ट्रॅक्ट घेण्याची खूप विनंती केली. मला **Ship Breaking Industries** ची पूर्ण माहिती होती. या कॉन्ट्रॅक्टमध्ये मला कमीत कमी रु. १.५० प्रति किलोग्रॅम फायदा सहज झाला असता. म्हणजे फायदा रु. १ कोटीच्यावर तो सुद्धा १९८० मध्ये पण मला नोकरी सोडावी लागली असती.

**आता तुम्हीच ठरवा – अशा प्रसंगी मी काय करणे आवश्यक होते?**
**आता मी काय केले ते सांगतो–**

मी काहीच केले नाही. अगदी एखाद्या सर्वसाधारण **G.S.B.** तरुणाप्रमाणे (आमच्या

पिढीच्या) मी त्यांची ऑफर प्रेमाने साभार नाकारली. माझ्यात तेवढी हिंमतच नव्हती की चांगली नोकरी सोडून एखाद्या धंद्याच्या मागे लागायचे.

३. हा माझ्या आयुष्यातला सर्वात महत्त्वाचा प्रसंग आहे. जानेवारी १९६० - माझे M.SC. चे शेवटचे वर्ष. ४-५ महिन्यानंतर माझी फायनल परीक्षा होती. मी बऱ्याच ठिकाणी नोकरीकरिता अर्ज केले होते. त्यापैकी **Indian Iron & Steel Co.Ltd (IISCO)** मधून मला **Sales Executive** या पदाच्या इंटरव्ह्यूकरिता बोलावले होते. ते सुद्धा जानेवारी १९६० मध्ये. परीक्षेच्या आधी इंटरव्ह्यूला जायला मी जरा नाखुषच होतो. तरीपण पहिल्याच कॉलला न जाऊन अपशकुन होऊ नये म्हणून नाईलाजाने **IISCO** च्या **office** मध्ये गेलो. तिथे दोन उमेदवार माझ्या आधीच येऊन बसले होते. त्यातला एक **Massachusetts Institute of Technology (MIT-USA)** चा पदवीधर होता व दुसरा लंडनच्या **University** मधून **Metallurgy** च्या संबंधात कुठल्यातरी विषयावर **Ph.D.** झाला होता. त्या दोघांपुढे मी तिसरा फक्त **B.Sc.** मला अशा अतिरथी महारथींसमोर जॉब मिळण्याची सुतराम शक्यता नव्हती. शिवाय ते दोघेही दिसायला स्मार्ट होते. व सुटाबुटात होते. मी साध्या सफारीसुटात आलो होतो. कुठल्याही अँगलमधून मला या दोघांसमोर नोकरी मिळण्याची जरा सुद्धा शक्यता वाटत नव्हती. इंटरव्ह्यू न देताच मी परत फिरण्याचा विचार करत होतो.

**आता तुम्हीच ठरवा - अशा प्रसंगी मी काय करणे आवश्यक होते?**

**आता मी काय केले ते सांगतो-**

मी परतण्याचा विचार अंमलात आणेपर्यंत मला बोर्डरुममध्ये बोलावणे आले. पण मी अगदी निश्चिंत होतो. जरासुद्धा धाकधुक, नर्व्हसनेस, बेचैनी माझ्या चेहऱ्यावर दिसत नव्हती. कारण मला १०० टक्के खात्री होती की मला हा जॉब मिळणे शक्यच नाही. एका मोठ्या प्रशस्त रुममध्ये तीन **Directors** एका भव्य मोहोगनी टेबलामागे बसले होते व समोर फक्त एकच खुर्ची ठेवली होती. मला त्या खुर्चीवर बसायला सांगितले. हे तिघेही **Directors, Ex-Defense Services** मधले होते. एक **Col. Dubey,** एक Army तील **Sr. Officer Mr. Lahiri** व तिसरे **Squadron Leader Sethna.** मला त्यांनी मी खुर्चीत स्थानापन्न झाल्यावर आधी चहाची ऑफर केली. टेबलावर एक सुबक किटलीमध्ये **Laptchu** चहा होता. हा अतिशय महागडा चहा. त्यावेळी फक्त **Taj** व इतर **Five Star** हॉटेलमध्येच दिला जात असे. मी विचार केला नोकरी तर मिळणार नाहीच तेव्हा आलोच आहे तर **Laptchu** चहा तरी एकदा पिऊन बघुया. मला चहा दिल्यानंतर त्यांनी सिगारेट ऑफर केली. ती सुद्धा **State Express-555.** माझी मजल **"Wills"** च्या पुढे कधी गेलीच नव्हती. तेव्हा मी बिनधास्त एक सिगारेट घेतली व शिलगावली. एक **Director** माझी सर्टिफिकेटस् चाळत होता.**SSC** झाल्यावर माझ्या वडिलांची बदली कलकत्याला झाली होती. म्हणून मी **St.Xavier's College** कलकत्त्याहून **Inter Science** केले होते व **B.Sc.** मुंबईहून Institute of Science मध्ये केले. कॉलेजात असतांना मी **NCC** मध्ये होतो व **Under Officer** पदाला

पोहोचलो होतो. **NCC** त विद्यार्थी जास्तीत जास्त **Under Offcer** पदापर्यंतच जाऊ शकतो. तसेच मला १९५६ साली **NCC** च्या **Second Bengal Battalion** च्या बंकुरा कँपमध्ये **Light Machine Gun (LMG-303)** च्या शुटींग स्पर्धेत **First Prize** मिळाले होते. ही सर्व सर्टिफिकेटस् पाहून तिन्ही **Directors** ना कदाचित मी त्यांच्या बिरादरीतलाच असावा असे वाटले असेल. मला त्यांनी फक्त एकच प्रश्न विचारला–आणि तो म्हणजे **LMG-303** चे वजन किती? **Politics, Economics, Business** वा इतर कोणत्याही विषयावरचे माझे 'सामान्य' ज्ञान खरोखच सामान्य होते. **LMG-303** चे वजन अर्थात मी अगदी बरोबर सांगितले, इतकेच नव्हे तर त्यांच्या वगेवगळ्या parts चे पण वजन सांगितले. तिघेही माझ्यावर खुश झाल्याचे मला दिसत होते. **"OK Mr. Kasbeker, we will let you know our decision in due course"** असे म्हणून मला जाण्याचा इशारा दिला. मी विचार केला, आपल्याला नोकरीचा अजिबात चान्स नाही, परत काही इथे येणे नाही, तेव्हा **"Can I have one more Cigarette Sir! Please"** माझ्या या अनपेक्षित प्रश्नाने ते तिघेही हादरले. **Yes! Yes!! Sure!!!** करत एकाने मला सिगारेट दिली. दुसऱ्याने ती पेटवली व मी आरामात झुरके घेत हसत हसत, डोळे विस्फारून माझ्याकडे पाहत असलेल्या **Directors** ना, बाय बाय करून बाहेर पडलो.

पंधरा दिवसात मला नोकरीवर रुजू होण्यासाठी तसेच बर्नपूरला ६ महिन्याला ट्रेनिंगला जाण्यासाठी तयार राहण्याचे पत्र मिळाले.

**अरुण भास्कर कसबेकर – ९८२०२९१३६५**

# मुंबई मंच - कारवारी मेळाव्याचे आमंत्रण

'**कारवारी खाद्यमेळाव्याला**' दरवर्षी मिळणाऱ्या उत्स्फूर्त प्रतिसादामुळे स्फूर्ती घेऊन यंदाही एक 'आनंद मेळावा' भरविण्यात येत आहे. पाककृतीशिवाय ज्यांना आपण बनविलेल्या वस्तू किंवा पदार्थ विक्रीसाठी किंवा प्रदर्शनासाठी ठेवायचे असतील, व ज्यांना बालगोपाळासाठी करमणुकीचे खेळ आयोजित करावयाचे असतील त्यांनाही गाळा मिळेल. इच्छुकांनी त्वरीत संपर्क साधावा.

**तारीख व समय** : रविवार ३१ जानेवारी २०१६ संध्याकाळी ५.०० ते ९.००
**कार्यस्थळ** : सरस्वती बाग, जोगेश्वरी, के.जी एस. सोसायटी पटांगण
**आकार** : रु. ७०० एका गाळयासाठी
**संपर्क** : गाळा आरक्षणासाठी व पाककृती ठरविण्यासाठी. **(रात्री ७ ते १०)**

**रसिका गायतोंडे : ९९६९७४४०१ राजू बोरकर : ९८२०९१७८४१**

**संपर्कासाठी अंतिम तारीख : २० जानेवारी २०१६**

प्रथम नोंदणी करणाऱ्यास प्राधान्य
किस्मूर, एरप्पे, सुकरुंडे, हीट, पातोळी इत्यादींवर ताव मारण्यासाठी
सर्वांनी मोठया संख्येने हजर राहावे.

## बालपणीच्या आठवणी

जुलै-सप्टेंबर २०१५ ची मुखपत्रिका हातात आली आणि ती एकहाती वाचून संपविली. मुखपत्रिकेतील सौ. मीरा व श्री. अरुण यांचे लेख वाचल्यानंतर मन गतकाळात हेलकावे घेऊ लागले. खरोखरच गेल्या एका वर्षात तेलंग कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला. त्यांच्या दुःखात आम्ही सर्व कारवारकर सहभागी आहोत.

माझे आठवीपर्यंतचे शिक्षण कारवारला बालमंदीर व हिंदू हायस्कूलमध्ये झाले. त्यानंतर मात्र (९ वी ते ११ वी) दादरला, बालमोहनला झाले. सुधीर तेलंग हा माझा कारवारमधील वर्गमित्र. माझी पहिली आठवण सुधीरची आई सुनितीताई व भाऊ उदय यांच्याबद्दलची आहे. कदाचित हा प्रसंग सुधीर व त्याच्या कुटुंबीयांना आज आठवतही नसेल, पण माझ्या मनात मात्र तो कायमचा कोरला गेला आहे.

त्यावेळी मी ४ थी किंवा ५ वीत असेन. सुधीरने मला त्यांच्या घरी संध्याकाळी खेळायला बोलावले होते. सुधीरकडे एक लाल रंगाचा केसाळ कुत्रा होता व तो मोठ्याने भुंकायचा. त्यामुळे मी सुधीरला खेळायला येत नाही असं म्हटलं. पण तो म्हणाला की आमचा कुत्रा फक्त भुंकतो, तो चावत नाही आणि आम्ही त्याला नेहमी बांधून ठेवतो. मग मी त्याला हो म्हटले व संध्याकाळी सहाच्या दरम्यान त्याच्या घरी गेलो. त्यांच्या गेटमधून आत जाऊन मी सुधीरला हाक मारली. पण सुधीर ऐवजी त्याचा कुत्रा भुंकत बाहेर आला व मला काही समजण्या आधी त्याने माझ्या मनगटाचा चावा घेतला. इतक्यात सुधीरची आई आणि उदय बाहेर आले व त्यांनी कुत्र्याला बाजूला काढले. सुधीरच्या आईने मला 'कोणरे तू?' म्हणून विचारले व मी 'प्रकाश', वाघ-फौजदारांचा मुलगा हे त्यांना रडतरडत सांगितले. लगेच त्यांनी पायात चपला घातल्या व उदयबरोबर मला पिकळे डॉक्टरांच्या दवाखान्यात नेले. रस्त्यात मी एकसारखा रडत होतो. पण ते कुत्रा चावल्यामुळे नसून, मला पोटात १४ इंजेक्शने घ्यायला लागतील या भितीमुळे. सुधीरची आई मला धीर देत म्हणाली, 'अरे वाघ मरे तूं? मागिर बायला म्हणकी रडता कित्याक?' यावर मी काय बोलणार? पिकळे डॉक्टरांनी मला तपासले व जखमेवर औषध म्हणून, ॲसिड टाकून जाळून टाकले. त्यांनी सांगितले की जखम वरवरची आहे, त्यामुळे काळजीचे कारण नाही. ॲसिड झोंबल्यामुळे मी जोरात ओरडलो. तेव्हां डॉक्टर म्हणाले 'वा आता कसो वाघा म्हणकी वदरलो,' आणि डोळे मिचकावून सुधीरच्या आईला म्हणाले, 'मुकार्ले १०-१५ दिवस तुमगेलो कुत्रो वाघा-म्हणकी वदरता की ते पळ्यात' सगळे हसत होते, मी मात्र बापूडवाणा हुंदके देत होतो. कारण मला त्यावेळी त्यांचे विनोद समजले नव्हते.

नंतर त्या (सुधीरच्या आई) घरी गेल्या व उदयने मला आमच्या घरी नेऊन सोडले. पुढील १०-१५ दिवस मी सुधीरला त्यांचा कुत्रा वाघासारखा ओरडतो का हे विचारत असे. आजही माझ्या मनगटावरचा भाजल्याचा पुसट डाग बघितल्यावर मला या प्रसंगाची आठवण होते व त्यातील तिन्ही व्यक्तींचीही आठवण येते. शिवाय त्यांनी प्रसंगोचित ताबडतोब केलेल्या मदतीने मन भरून येते.

त्यावेळी आम्ही कारवारमधील काजुबाग या परिसरात रहात असू, आमच्याकडे एक घाऱ्या डोळ्यांचा पांढरा-सफेद व चॉकलेटी ठिपक्यांचा कुत्रा होता. घाऱ्या डोळ्यांमुळे आम्ही त्याला 'घारु' असे नाव दिले होते. श्रीयुत अरुण कसबेकर यांच्या लेखातील एम्.एस.वागळे, अे.के. राव, एस्.डी. भेंडे वगैरे ऋषीतुल्य सर आमच्या वाट्याला फक्त ऑफ पिरेडला यायचे. पण दुसऱ्या फळीतील सरही (अे.व्ही. कुलकर्णी, शानभाग, सबनीस, सुखटणकर बाई वगैरे) चांगले शिकवायचे. त्याकाळी ए.डी. कुलकर्णी, अे.व्ही. कुलकर्णी, बी.के. गायतोंडे, वाघ बाई, एन्.आर. ब्रह्मे वगैरे शिक्षक काजुबाग परिसरात रहायचे. माझ्या आईबरोबर व भाऊ (सुरेश), बहीण (विजया-बेबी) यांच्या सोबत घारु (कुत्रा) ही त्यांच्या (सरांच्या) घरी फिरत असे. मी त्यावेळी ६ वी मध्ये होतो. एकदा घारु माझ्याबरोबर आमच्या शाळेतही आला व माझ्याबरोबर थेट माझ्या वर्गात. मी त्याला कितीही हाकलण्याचा प्रयत्न केला तरी तो वर्गातून बाहेरच जाईना. उलट, वर्गात पळायला लागला. मुली घाबरून किंचाळायला लागल्या व मला लाज वाटायला लागली. काय करावे हे मला आणि माझ्या मित्रांना समजेनासे झाले. इतक्यात आमचे सायन्सचे सर 'अे. व्ही. कुलकर्णी' वर्गात शिरले. सर्व वर्ग उभा राहिला. घारु मात्र कूंऽऽकूंऽऽ करून सरांभोवती फिरू लागला. तो सरांना ओळखत असे. सरांनी लगेच विचारले, 'घारण्णा, तू आज किते सायन्स शिकच्या आयला? फी भरली मरे,' घारूने शेपटी हलवली. मग सर परत म्हणाले, 'बरेऽऽ, गप्प बसचे हाँ!! गडबड केल्यार वर्गातल्यान् भायर घालतलो' आणि आश्चर्य म्हणजे त्यांचा पूर्ण तास घारू वर्गात माझ्या शेजारी गप्प बसून राहिला. सरांनी पूर्ण तास शिकवून झाल्यावर तो सरांबरोबर बाहेर गेला. त्याला सरांनी शिकविलेले किती समजले ते माहिती नाही पण मी मात्र पूर्ण तास माझ्या 'इज्जत का फालुदा' झाल्यामुळे डोके खाली घालून बाकावर बसलो होतो. सरांनी शिकविलेले सर्व माझ्या डोक्यावरून 'बंपर' गेले होते.

अशाच आणखी काही स्मरणीय आठवणी पुन्हा कधी तरी.

**प्रकाश महारुद्र वाघ, (मुलुंड), – ९३२२४०३००३**


www.kccgoa.in




अप्रतिम निसर्गाने नटलेलं **सुखसमृद्धी**

**मंगेशाच्या देवळापासून २ मिनिटांच्या अंतरावर,**
**मंगेशी, फोंडा- गोवा**

**प्रॉजेक्ट मान्यता: गोवा टाउन प्लॅनिंग**
**कर्जसहाय्य: नामवंत वित्त संस्था**



मनाला भुरळ घालणारं गोव्याचं आल्हाददायक सृष्टीसौंदर्य, प्रदूषणविरहीत हवा, खळाळणारं पाणी आणि सोबत मंगेश, म्हाळसा, नृसिंह, नवदुर्गा अशा देव-देवतांच्या सान्निध्याने पवित्र झालेला परिसर याने नटलेला आमचा नवा प्रकल्प 'सुखसमृद्धी' म्हणजे नावाला साजेसं असं सुख, समृद्धी आणि मांगल्याचं वरदान ठरेल हे नक्कीच. निसर्गाच्या सान्निध्यात राहून मनःशांति मिळविण्यासाठी आजच आमच्याशी संपर्क साधा.

**फ्लॅटस् उपलब्ध: १ रुम किचन, १ बी.एच्.के, २ बी.एच्.के**

a Project by:
## कुणाल कन्स्ट्रक्शन कंपनी

मुंबई ऑफिस: श्री. उमेश केरकर, 401, चौथा मजला, व्योम आर्केड, युनायटेड इंक कंपनीच्या बाजूला,
सुभाष रोड, विलेपार्ले (पू), मुंबई- 400057. टलि:**2683 3841/47/72.** मोबा: **98336 36451**
फॅक्स: 2683 3872 ई-मेल: kunalconstruction@vsnl.net, kunalconstructiongoa@yahoo.in

गोवा ऑफिस: टी- १, रॉयल हाऊस, काझीवाडो, फोंडा- गोवा. मोबा: 98209 33352, 98206 33321

गोवा साईट: 95/1, वेलिंग, मंगेशी, म्हार्दोळ, फोंडा- गोवा

saadadvertising.com

## विवाह /वाङ्निश्चय

| | | |
|---|---|---|
| अमृता शरद गायतोंडे, पुणे | व | हर्षद विनय आगाशे, पुणे |
| प्रसाद दुर्गादास गायतोंडे, अंधेरी | व | अर्चना राजेंद्र कुलकर्णी, दहिसर |
| तन्वी सुधीर नाडकर्णी, मीरा रोड | व | अमर राजेंद्र सामंत, कांदीवली |
| निकीता शंकर नाडकर्णी, जोगेश्वरी | व | तेजस विलास कुलकर्णी, चेंबूर |
| नताशा संदीप पिकळे, अंधेरी | व | मंगेश सतीश राजाध्यक्ष, डोंबीवली |
| अंजोर विजय वागळे, डोंबीवली | व | रोहन शेखर कुलकर्णी, नालासोपारा |


**RUKHWAT *(रुखवत)* FOR WEDDING**

**For Order Contact : SHAILAJA TELANG PAI, Thane**
**2532 1337 / 9869352680**

**ECONOMIC PACKAGE - Rs. 4,000**
**DELUX PACKAGE - Rs. 5,000**
**EXOTIC PACKAGE - Rs. 15,000**


## ठाणे मंच वधूवर सूचक मंडळ


**घरबसल्या मनपसंद जोडीदार निवडा**

**www. nkgsbmatrimony.com**

आमचे मंडळ गेली अनेक वर्षे मुंबई-ठाणे-पुणे परिसरात सहा केंद्रातून समाजाला उपयुक्त अशी सेवा देत आहे. आमच्या युवा पिढीच्या विनंतीवरुन आणि काळाची गरज ओळखून आम्ही दसऱ्याच्या शुभमुहुर्तावर आमची वर नमूद केलेली On-line सेवा कार्यान्वित करण्यात आली आहे. ही सेवा सुध्दा सारस्वत समाजापुरतीच मर्यादित असेल. आपण सर्वांनी इच्छुक तरुण वर्गास आमच्या या आधुनिक सेवेबद्दल जरुर कळविणे. आपल्या सहकार्यावर आमचे यश अवलंबून असेल. नवीन On-line सेवेसोबत सध्या कार्यरत असलेली केंद्रे चालूच राहतील. ज्यांचे फॉर्म्स आमच्या केंद्रावर सध्या आहेत त्याना तीन महिन्याच्या मर्यादित कालावधीसाठी On-line सेवा विनामूल्य उपलब्ध असेल, कृपया नोंद घ्यावी.

**अधिक माहिती साठी संपर्क**

**सुरेश पालेकर** - ९९६९४५५३७० **मंजिरी कुलकर्णी** - ९६६५०९८११७



**Some relations are very special !**

...........And so our services have brought far distances closer !!

**Deepavali 2015**, Do you wish to send Food-Stuff (Deepavali Faraal ), Kandeel, Garments, household commodities, Branded spices , Pickles, Mysore soap etc to your special ones ?

We will deliver it **SAFELY**, with **SPEED** and **RELIABILITY** !!

**USA, CANADA , SINGAPORE , U.A.E** and **EUROPE**.

**AUSTRALIA, NEW ZEALAND**

Only Branded food-stuff .

**( home made prohibited )**

**Contact : S-S International**

**Landline : 022 – 28 28 12 48 / +91 996 7055 798**

**Pickup :** Free Pick-up from your door-step

**Packaging :** Parcels will be re-packed in Carton.

**Services :** Through Leading Express Logistics Company only

**Chargeable Weight:** Volumetric or Actual, Whichever higher

**Dimension Weight calculation :**

( Length x Breadth x Height ) ÷ 5000 Express Company Weight will be final

**Pricing :** Per Kilo Pricing 3 kg onwards till 20 kgs

**Airwaybill Number :**

Will be Communicated after booking with Express Co.

**Prohibited / Restricted commodities :**

Bullion , Jewelry / Precious stones / Currency or Equivalent, Animal Products, Toy Gun, Soft Toys, Pharmaceutical Products ( Medicines ), Perfume Spray, Unbranded Flour, Knives, Perishable Food-stuff with short shelf-life, wax lamps, Uttan ( Utna powder )

*Note :*

***Do not conceal any prohibited commodity. Any Prohibited product found, will attract penalty as per final Carrier***

**Mandatory Documents :** (1). Invoice Copy with correct value, (2). KYC ( Self Attested ): Adhar Card **or** Pan Card **with** MTNL Bill copy **or** Passport photocopy **or** Driving Licence.

**S-S International**

## ज्येष्ठ शिक्षिका कु. लीला दिवेकर व कु. निर्मला वाघ यांचे देहावसान

कु. लीला यशवंत दिवेकर या गांवदेवी येथील सेंट कोलंबा स्कूलच्या निवृत्त विज्ञान शिक्षिका. निवृत्तीसमयी त्या तेथे **Vice Principal** होत्या. महाराष्ट्र शासनातर्फे प्रतिवर्षी नामवंत शिक्षकांना प्रशंसेचा पुरस्कार देण्यात येतो. १९८१ साली त्यांना हा पुरस्कार मिळाला होता. तेव्हां मुखपत्रिकेच्या ऑक्टोबर १९८१ च्या अंकात त्यांचा परिचय करून दिला होता. विज्ञानाचा अभ्यासक्रम अधिक कार्यक्षम बनविण्यासाठी त्या सतत कार्यरत असत. विज्ञान मंडळ, अभ्यास वर्ग, बॉम्बे असोसिएशन फॉर सायन्स एज्युकेशन या सर्व संस्थांत त्या सदैव मग्न असत. त्यांची शाळा, त्यांच्याच मार्गदर्शनाखाली विज्ञान प्रदर्शनात भाग घेत असे व बहुतेक वेळा त्यांच्याच शाळेला पारितोषिके मिळत असत. उतारवयात त्या पुण्यात स्थायिक झाल्या तरीही शिक्षणक्षेत्रांत विशेषतः मागासलेल्या भागात, त्या सतत कार्यरत असत. २६ जुलै रोजी त्यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या कार्याचा आढावा घेणारा एक लेख ॲडमिरल जयंत नाडकर्णी यांनी मुखपत्रिकेसाठी पाठविलेला आहे व तो याच अंकात उद्धृत केलेला आहे.

कारवार येथील सुप्रसिद्ध डॉ. वामनराव वाघ यांच्या कन्या म्हणजे निर्मला वाघ. त्या कारवारच्या परिसरात 'वाघबाई' म्हणूनच परिचित होत्या. विल्सन कॉलेजमधून बीएस्सीची पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर १९५६ साली त्या हिंदू हायस्कूलमध्ये शिक्षिका म्हणून रुजू झाल्या. कालांतराने हिंदू हायस्कूलमधून कन्या शाळा विभक्त करण्यात आली. (सध्याची सुमती दामले हायस्कूल फॉर गर्ल्स) व तेथे त्या शिकवू लागल्या. एप्रिल १९७६ ते मार्च १९८४ या कालावधीत त्या कन्या शाळेच्या मुख्याध्यापिका होत्या. त्यांची लोकप्रियता व सहिष्णुता वाखाणण्याजोगी होती. १८ सप्टेंबर रोजी ऋषीपंचमीच्या दिवशीच या ऋषीतुल्य शिक्षिकेचे देहावसान होणे म्हणजे योगायोगच. इतरांना सदैव साहाय्य करण्यात तत्पर असलेल्या निर्मलाताईंनी आपल्या स्वभावाला अनुसरून देहदान केले.

निर्मलाताईंवरचा, त्यांच्या सहाध्यायी सौ. वृंदा बोरकर दळवी यांनी लिहिलेला श्रद्धांजलीवजा लेख याच अंकात प्रसिद्ध केला आहे.


**SHREE HOMOEOPATHIC PHARMACY**

**Wholesale & Retail For :**
**Genuine India & Imported Homoeopathic Medicines**

Laxmi Ratan Co-op. Hsg., Shop No. 6, Opp. Karnataka Sangh Hall, Mogal Lane, Matunga (West), Mumbai - 400 016. Tel. : 2438 3092 / 2430 9035 Mob. : 98694 83433
Time : 9.00 a.m. to 8.00 p.m. **(SUNDAY CLOSED)**

**Mrs. Nandita D. Wagle, Dr. Divya D. Wagle (BHMS. Bom.), Dr. Dilip M. Wagle (LCEH. Bom.)**

## Leela Divekar – A great educationist and Human Being

My sister-in-law, Ms Leela Yeshwant Divekar, lifelong educationist and social service worker, passed away on 26th July 2015 at Pune. She was 86. She had been ailing for a few years before her death.

Leelatai or Baay as she was called affectionately by close relatives, was the daughter of well known Conservator of Forests, Shri Y.R.Divekar. She was born at Honavar on 25th May 1929, Her early education was in schools at Karwar, Alibag and Nashik where her father was posted in the course of his duties.There, under the tutilege of her father, she developed a great love for the outdoors along with the flora and fauna of her surroundings. She was especially attracted to the subjects of botany and biology.

After completing her school education, Leelatai did her higher education in Pune and Mumbai where she graduated in Science from Fergusson College and Mumbai's St Xaviers College respectively obtaining a BSc and later an MSc degree from these colleges.

She had always wanted to teach and for this reason she enrolled at Shanti Niketan and after two years obtained a BEd from there. On return to Mumbai she joined St Columba High School as a Science and Maths teacher. She was there for the next 35 years finally retiring as the Vice Principal of the school.

She was a very popular teacher and her teaching methods were novel. She encouraged her pupils to be inquisitive and to never take things for granted. She particularly hated the method of learning by rote and what is known in Marathi as **"Ghokampatti",**.Some of her pupils of those days still remember her for her vast knowledge, complete command over her subject and her methods of putting things across. I remember the amount of pain and effort she used to spend on preparing every lesson. For example, to teach the subject of biology, she visited a mutton shop and bought a liver and a heart!.She was not just a teacher but always like a mother and confidant to her pupils.She was awarded the Best Teacher in Science by the Maharashtra Government.

Leelatai's thirst for knowledge was enormous. In her childhood she devoured books in her father's library including Bertrand Russell, Bernard Shaw and Tolstoy. She was an avid reader and her tastes ran mainly to science books

and she read astronomy, biology, mathematics, astrophysics and microbiology. But she was also fond of other subjects. She had read in detail both the Ramayana and Mahabharat and we used to be astounded by her mastery over these subjects, Right up to old age she could recall each and every name and battle. She was indeed an authority on the Puranas.

Leelatai had absolutely no interest in things which all women love such as jewellery and fine clothes' She remained simple and modest all her life wearing plain cotton sarees. Her only purchases used to be books.

After retiring from school she devoted the rest of her life to social service. She looked after her aged mother in a small flat in Mumbai and later her elder sister. After their deaths she shifted to Pune to be near her brothers and sister. The Divekars were and are a close knit family.

Leelatai was very fond of children. Having no children of her own, she lavished her affection on her nephews and nieces and they in turn doted on her. She used to relate stories from Ramayana and Mahabharat to them and explain science in a simple way.

She wanted to make use of her vast knowledge and money and with help of her elder brother Vasant and some assistants she conceptualized and later built a model school in a remote village near Sholapur. The school is about 15 kms from Bhigwan and is intended to teach under privileged children of poor farmers in the area. The school is completely free and all the finances are looked after by a trust founded by her in the name of her father and mother. The Yesh-Kalyani Education Trust is fully funded by her wealth and assets.

By taking advice from some education pioneers she has established certain ideas in the school. Children are taught certain trades such as carpentary, electrical and machining with the help of suitable instruments.The school also has a state-of-the-art laboratory to impart scientific knowledge, Leelatai was able to see the completion of the school and inaugurate it just a month before her death.

In the loss of Leela Divekar our community, indeed Maharashtra, has lost a great educationist and a human being.

**Admiral Jayant Nadkarni (Retd), Pune**

## डॉ. वामनराव वाघ यांच्या कन्या व हिन्दू स्कूल कन्याशाळेच्या मुख्याध्यापिका कु. निर्मला वाघ यांना श्रध्दांजली

'युवती मना दा ऽऽ रुण झुण रुचिर प्रेम से' कुठून तरी ही गाण्याची लकेर आली. आणि मला भूतकाळात घेऊन गेली. हे गाणें मी पहिल्यांदा ऐकलं ते निमाताईंकडूनच आणि तेव्हापासून माझ्यासाठी ते निमाताईंचंच गाणं झालं. तसंच ते मीरा बाईचं भजन 'मीरा के प्रभु गिरीधर नागर' किंवा 'ओ सजना बरखा बहार आयी' अशा तिने गायलेल्या गोड गाण्यानें करवार मधल्या ससिकांना निमाताई आठवत असेलच! आपल्या उत्स्फूर्तपणे शाबासकी देण्याच्या स्वभावाने, 'जे जे आपणाशी ठावे ते ते इतरांशी शिकवावे.' या भावनेने तिने अनेक माणसें जोडली!

माझ्या आईची ती सावत्रचुलत बहीण पण सावत्र पणाचा लवलेश नसलेल्या वाघांच्या घरांत, माझ्या आजोळी, आपले वडील डॉ. वामनराव वाघ व आजोबा जज्ज व्यंकटराव वाघ यांच्या पश्चात त्या एवढ्या मोठ्या घराचा डोलारा तिने चाळीस वर्षे समर्थपणे सांभाळला. एवढेच नव्हे तर, एखाद्या मुलापेक्षाही जास्त प्रेमाने, समर्थपणे आपल्या आईचा आहिल्याकाकींचा सांभाळ केला! घरी येणाऱ्या सगळ्या नातलगांचे, वाघांचे (दूरस्थ राहणाऱ्या) सदैव हसत मुखाने स्वागत करुन वाघांचे नांव व घराचे घरपण राखले!

विल्सन कॉलेजमधून बीएस्सी केल्यावर निमाताईने आईवडिलांसाठी म्हणून कारवारला येवून कर्मभूमी म्हणून हिंदू हायस्कूलमध्ये शिक्षिकेचा पेशा स्वीकारला! 'निर्मला वाघ' ऊर्फ 'वाघबाई' मुलांमध्ये ही खूप प्रिय होत्या. मुलांमध्ये मूल होऊन वागण्याचा हातोटीमुळे मोठ्यांपासून लहानांपर्यंत सर्वांचा तिच्यावर लोभ जडला होता. आपल्या नातलगांची मुलं असोत वा शेजारच्या बाडकरांची मेधा असो सर्वांवर तिने सारखेच प्रेम केलं.

शैक्षणिक क्षेत्रात सुध्दा **BEd** करुन तिने आपली पात्रता वाढवली इतकंच नव्हे तर हिंदू हायस्कूलच्या कन्याशाळेची मुख्याध्यापिका होण्याचा मान पटकावला व शाळेची सर्वांगीण प्रगती करण्यासाठी झटली!

निवृत्तीनंतर मुंबईला आल्यावरही तिची वृत्ती सतत मदत करण्याचीच होती. अहिल्याकाकी, आपली बहीण सोनूबाई व भावोजी (मधुकर आंबे) यांचा सांभाळ तिने शेवटपर्यंत केला. त्याच बरोबर कुणाला 'रेकीची दीक्षा' दे, कुणाला कवितांची पुस्तके भेट दे, शिवाजी पार्कच्या भजनी मंडळात कुणाला भजन शिकव, कुणाला नक्षत्रांची ओळख करुन दे, तर कुणाला भरतकाम शिकव. असे करत आपल्या आनंद यात्रेत तिनें अनेकांना सामील करुन घेतले. शेवटची दहा वर्षे मात्र ती पुण्याच्या वृध्दाश्रमात होती. तिथेच कोमात ऋषीपंचमीच्या दिवशी निधन झालेल्या ह्या नाईटिंगेलने आपल्या वृत्तीला साजेशा पध्दतीने 'देहदान' केले! तेव्हा आपल्या सेवा भावीवृत्तीने व निरलसपणाने कारवारकरांसाठी झटण्याऱ्या दत्तात्रय नाडकर्णींच्या एका फोन कॉलवर लगेच, दुसऱ्या दिवशीं हिंदू हायस्कूलमध्ये शोक सभा घेतली गेली! पण निमाताई, तुझ्या गाण्यातून, तुझ्या खळखळत्या हसण्यातून तूं अजून आमच्यातच आहेस व असशील!

**सौ. वृन्दा दळवी, वांद्रे - २६४१७२७३**

## दिवंगत रमेशचंद्र कसबेकर
## निरोप घेतानां..........

(८ ऑगस्ट २०१५ रोजी श्री रमेशचंद्र गजानन कसबेकर यांचे अंधेरी येथे निधन झाले. त्यांची भावजय सौ. शोभा यांनी उजळल्या आहेत त्यांच्या काही आठवणी)

८ ऑगस्टची पहाटेची वेळ. आमच्या घरी फोन खणखणला. धस्स झालं मनांत. पलीकडून आवाज आला ''रमेश गेला''.... पण मन मात्र मानायला तयार होईना. गेली सव्वा वर्षे कर्क रोगाशी चाललेली रमेशदादांची झुंज एवढ्या लवकर संपेल असं वाटलंच नव्हतं. जगण्याची ऊर्जा कुठंतरी त्यांना साथ देत राहील, असंच वाटायचं. पण नियतीला मात्र हे मंजूर नव्हतं हेच खरं!

लक्षात राहील ते त्यांचं शिस्तप्रिय जीवन. शाळा कॉलेजपासूनच त्यांच्या रक्तांत भिनलेली शिस्त त्यांनी आयुष्यभर बाळगली. ही शिस्त त्यांनी दुसऱ्या कुणावरही लादली नाही हेही एक विशेष. त्यांचे कपडे असोत किंवा त्यांनी केलेली वर्तमानपत्राची घडी. त्यांत त्यांची टापटीप जाणवायची, त्यांचं आयुष्यच मुळी शिस्तबद्ध होतं. सकाळी उठल्यावर मॉर्निंग वॉक हा ठरलेला. व्यायाम तर कधीच चुकत नव्हता. सतत कामात व्यग्र राहण्याची संवय त्यांनी स्वतःला लावून घेतली होती. आळसाशी तर त्यांच वैरच होतं. जे आहे ते स्वीकारण्याची वृत्ती होती. आहाराच्या बाबतीत सुद्धा संयमी स्वभाव. आवडलं म्हणून खात राहायचं त्यांना पटायचंच नाही. कुठलंच व्यसन नव्हतं त्यांना अगदी चहा कॉफी सुद्धा. मला आठवतेय ती बा.भ. बोरकरांची ही कविता

**''उठल्या सुटल्या देऊ नको ग भान मला वाढत्या वयाचे**
**असेच आहे धुंदपणाने वयास चुकवित जगावयाचे.''**

रमेशदादाही असंच जीवन जगले. वाढत्या वयाची दुसऱ्यांनी करून दिलेली जाणीव त्यांना अजिबात रुचत नव्हती. कुठलीही गोष्ट करण्यासाठी, शिकण्यासाठी, वयाचं बंधन नसावं असा आग्रह असायचा. नवीन शिकण्याची सतत ओढ होती. संसाराप्रमाणेच पुस्तक, नाटक, सिनेमा यासारख्या कलांच्या माध्यमातून ते जीवनाचा आनंद लुटत राहिले. यांत त्यांना शरयूवहिनींनी शेवटपर्यंत दिलेली साथ मोलाची ठरली. आनंदाची रंगत अधिकच वाढली.

नाटक हा त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय. त्यांच्या आठवणीत ते धुंद व्हायचे. समीक्षकांची भूमिका घ्यायला त्यांना आवडायची. त्यांच्या संग्रही विविध विषयांवरची विविध प्रकृतीची पुस्तके होती. वेगवेगळ्या विषयांचा गाढा अभ्यास होता. विचारांची मांडणीही योजनाबध्द असायची. नवीन पुस्तकांची नोंद कुणाकडून मिळाली की लगेच आणून वाचायची तयारी, हा त्यांचा आवडता छंद. पुस्तक कसं जपावं हेही रमेशदादांकडून शिकावं. आध्यात्मिक वाचनात त्यांनी रस घेतला. जे. के. कृष्णमूर्तींच्या विचारांची त्यांच्या मनावर पकड होती. त्यांनी घरात बनवलेली पुस्तकांची

लायब्ररी या सर्व गुणांची साक्ष देतात. व्यावसायिकदृष्ट्या सायकॉलोजी व ह्यूमन रिलेशन्सची धुरा सांभाळताना या गुणांची त्यांना खूपच मदत झाली.

लहान मुलं असो किंवा ज्येष्ठ. ते सर्वांशींच एकरुप होत. त्यामुळेंच ते सर्वांना आवडायचे. दुसऱ्यांना मदत करायला सदैव तयार पण दुसऱ्यांकडून कधीच मदतीची अपेक्षा नसे. स्वभावही हळवा. आपल्या कर्तव्यांना ते कधीच विसरले नाहीत. अशा एक ना दोन अनेक आठवणी डोळ्यापुढे येतात. मन व्याकुळ होतं. असं हे बहुरूपी व्यक्तिमत्व आमच्या आयुष्यांत कायमचंच लक्षात राहील हेच खरं!

आम्हा सर्वांची रमेशदादांना भावपूर्ण श्रध्दांजली

**(प्रायोजित)** **सौ. शोभना कसबेकर, माहीम ६५२०६२३५**

## दिवंगत श्री विश्वनाथ मंजुनाथ वागळे
## श्रद्धांजली

लहानपणी पुराणातल्या कथा वाचताना एका गोष्टीची भुरळ पडायची ती म्हणजे खूप तपश्चर्या केली की देव प्रसन्न होतो आणि वर देतो की मी तुझी कोणतीही इच्छा पूर्ण करतो. यथावकाश मीही पुराणातली वांगी विसरुन गेलो. पुढे १९७७ च्या डिसेंबर महिन्यात माझे लक्ष्मी बरोबर लग्न जमले आणि माझी आणि विश्वनाथ मंजुनाथ वागळे या माझ्या दिवंगत सासऱ्यांशी ओळख होत गेली.


(जन्म ३/३/१९२३, मृत्यू १४/९/१९६५) अचाट कर्तृत्व गाजवून गेलेल्या माणसाचा मला सहवास लाभून घेण्याची रुखरुख लागली. ते हयात असते तर माझे सासरे नव्हे तर चांगले मित्र झाले असते याची मला खात्री आहे. त्याकाळी बहुसंख्य कारवारी तरुण सरकारी नोकरीत जात. वागळे यांनी सुद्धा पदवी परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर **" Forest Academy Dehradun "** मधून प्रशिक्षण घेऊन वनखात्यामध्ये वनअधिकारी पदावर नोकरी घेतली आणि यशाची उत्तुंगशिखरे पादाक्रांत केली. वयाच्या अवघ्या चाळीसाव्या वर्षी त्यांनी **Conservator of Forest** हे अत्यंत मानाचे पद पटकावले. मला वाटले अजूनही हा उच्चांक असावा. त्यासाठी त्यांनी अपार मेहनत घेतली. वेगवेगळ्या ठिकाणी त्यांच्या बदल्या व्हायच्या. धुळे, अलिबाग, पुणे, नाशिक वगैरे. निधनाच्या आधी काही दिवस त्यांचे जर्मनीला training साठी जायचे बेत चालले होते. पण नियतीला ते मंजूर नसावे. त्यांचा सर्वात जास्त सहवास लाभलेले माझे चुलत सासरे शंकरकाकाशी (श्री शंकर वागळे) गप्पा मारताना त्यांच्या स्वभावतले आणखी काही पैलू उलगडत गेले. ते अत्यंत शांत स्वभावाचे आणि मृदुभाषी होते. काम आणि जबाबदारीचे प्रचंड दडपण असूनही कोणीही त्यांना कधीही चिडलेले पाहिले नाही. ते निर्व्यसनी होते आणि दृष्टे होते.

भविष्य काळात इंग्रजीला येणारे महत्व ओळखून त्यांनी आपल्या दोन्ही मुलींना मराठी माध्यमातून काढून इंग्रजी माध्यमात टाकले. ही त्यांची चाल किती यशस्वी ठरली हे त्यांच्या दोन्ही मुलींनी (माझी पत्नी लक्ष्मी आणि मेहुणी शोभा) पुढील आयुष्यात दाखवूनही दिले.

आणखी एक मजेची गोष्ट म्हणजे त्यांना कोणीही विश्वनाथ या नावाने कधीही हाक मारली नाही. सर्व जण त्यांना भाई म्हणत आणि वयाने जेष्ठ असलेली मंडळी विशू या नावाने त्यांना हाक मारीत असत.

तर या पुराणातल्या कथेप्रमाणे देव जर माझ्यावर प्रसन्न झाला तर मी त्याच्याकडे एकच मागणं मागेन की देवा आमच्या बाबांना तुझ्याकडे येऊन पन्नास वर्षे झाली. आता फक्त एकच दिवसासाठी त्यांना परत भूतलावर पाठव. मला त्यांना कडकडून भेटायचं आहे. त्यांचे आशीर्वाद घ्यायचे आहेत. त्यांच्याशी गप्पा मारायच्या आहेत. सासऱ्यांचं प्रेम एक दिवस का होईना पण घ्यायचं आहे. खरं तर लक्ष्मीचे मामा श्री विठ्ठल पालेकर यांनी मला सासऱ्यांची उणीव कधीही भासू दिली नाही. पण तरीही फक्त एकच दिवस.

**सुधीर (अविनाश) बा. नाडकर्णी, दादर (२४२२ ३९६३)**



# निधन

| | | |
|---|---|---|
| माधव यशवंत बोरकर | (चेंडिये) | प्रभादेवी |
| लता गोविंद बोरकर | (कोडीबाग) | माहीम |
| उमेश शांताराम भेंडे | (कारवार) | अमेरिका |
| वर्षा शामकांत दळवी | (किन्नर) | ठाणे |
| सुनंदा रमाकांत देसाई | (कडवाड) | दादर |
| लीला यशवंत दिवेकर | (कणसगिरी) | पुणे |
| शोभा प्रभाकर कामत | | |
| (पूर्वाश्रमीच्या सिंधू गोविंद पिंगे) | (सदाशिवगड) | माहीम |
| रमेशचंद्र गजानन कसबेकर | (कडवाड) | अंधेरी |
| राजेन्द्र देवीदास कसबेकर | (कडवाड) | दादर |
| मोहन वसंत कसबेकर | (कडवाड) | मालाड |
| अनघा शरद कैसरे | (यल्लापूर) | अंधेरी |
| प्रभावती (कुंदा) दिनकर मुझुमदार | (अंकोला) | पुणे |
| देवीदास दत्तात्रय कुलकर्णी | (अवर्सा) | ठाणे |
| नंदिनी बाबुराव नाडकर्णी | (सांवरपै) | माहीम |
| माधव वामन नाडकर्णी | (अंकोला) | पुणे |
| जयश्री जगदीश नाडकर्णी | (मिटबंदर) | वाशी |
| दत्तात्रय (विलास) बाळकृष्ण पालेकर | (बाड) | जोगेश्वरी |
| लता काशिनाथ पालेकर | (बिणगे) | माहीम |
| शरद रामराव पिकळे | (अंकोला) | माहीम |
| इंदू विनायक रेगे * | | |
| (पूर्वाश्रमीच्या इंदू शांताराम गायतोंडे) | (हळगे) | कारवार |
| धनिष्ठा शरद शानभाग | | |
| (पूर्वाश्रमीच्या धनिष्ठा शांताराम पिकळे) | (अंकोला) | माहीम |
| विश्वनाथ मल्लप्पा तेलंग | (हळदीपूर) | भांडूप |
| सच्चित प्रेमानंद वाघ | (सदाशिवगड) | पारले |
| सरोज प्रभाकर वाघ | (सदाशिवगड) | वांद्रे |
| निर्मला वामन वाघ** | (सदाशिवगड) | पुणे |
| रमेश विठ्ठल वागळे | (माजाळी) | माहीम |
| रमेश गुणेश्वर वागळे | (माजाळी) | बोरीवली |
| मालती दिनकर वर्टी | (बाड) | अंधेरी(प.) |

*** इंदू रेगे यांनी नेत्रदान केलेले आहे. ** निर्मला वाघ यांनी देहदान केलेले आहे.**

# संघास व एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

(मागील अंकानंतर)

उल्लेखनीय देणग्या

**श्रीमती सुधालक्ष्मी व श्री अनंत आंबे यांच्यातर्फे**
**संघाला २१ लाख रुपयांची देणगी.**

दादर (प.) येथे राहणारे श्री. अनंत (मधुकर) दत्ताराम आंबे व श्रीमती सुधालक्ष्मी (कारवार येथील सुप्रसिद्ध डॉ. वामनराव वाघ यांच्या कन्या) यांचे अनुक्रमे १९८९ व १९९९ साली निधन झाले. आपला संघ ज्या निरलस पद्धतीने गरजू ज्ञातिबांधवांना कायमस्वरूपी व अडचणीच्या वेळी आर्थिक साहाय्य करीत असते त्या समाजसेवेबद्दल उभयतांना नेहमीच कौतुक असे. त्या कौतुकाचे प्रतीक म्हणून अलीकडेच त्यांच्यातर्फे समाजसेवा निधीसाठी संघाला २१ लाख रुपयांची देणगी मिळालेली आहे.

**श्रीमती लक्ष्मीबाई व वकील श्री. वैकुंठराव नीलकुंद यांच्या स्मरणार्थ**
**एज्युकेशन सोसायटीला दोन लाख रुपयांची देणगी**

मागच्या पिढीत शिर्सी येथे श्री वैकुंठराव नीलकुंद एक नामांकित वकील होऊन गेले. त्यांचे दोन सुपुत्र श्री. नागेन्द्रनाथ व श्री. बालगंगाधर हे अंधेरी येथे स्थायिक झाले होते. अलीकडेच वकील श्री. वैकुंठराव व श्रीमती लक्ष्मीबाई नीलकुंद यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ श्री. नागेन्द्रनाथ व श्रीमती सुशीला नीलकुंद आणि श्री. बालगंगाधर व श्रीमती आशाबाई नीलकुंद यांच्यातर्फे एज्युकेशन सोसायटीला प्रत्येकी एक लाख रुपयांची देणगी मिळालेली आहे.

**तत्त्वनिष्ठ श्री रमाकांत कंटक यांच्या जन्मशताब्दीप्रसंगी**
**वृद्धसेवानिधीसाठी १ लाख ५३ हजार रुपयांची देणगी**

कै. श्री. रमाकांत शामराव कंटक म्हणजे गेल्या पिढीतील एक तत्त्वनिष्ठ व्यक्तिमत्व. तत्त्वनिष्ठ एवढे की उच्चपद विभूषित करूनही आजन्म त्यांनी फक्त खादीचे कपडे वापरले. तत्त्वनिष्ठ असले तरी ते कर्मठ नव्हते. गोरापान रंग, देखणं रूप, सदैव हसतमुख चेहरा, हौशी, कुटुंबवत्सल यांमुळे ते सर्वांना हवेहवेसे वाटत. गिरगांवमधील सीता बिल्डींग जेथे ते राहायचे तेथील मंडळाचे ते कित्येक वर्षे अध्यक्ष होते. तेथील संमेलनाच्या वेळी रामदास कामत, बाळकराम, लालजी देसाई, सुलोचना चव्हाण, सुरेश हळदणकर इत्यादी नामवंत कलाकारांची सरबराई त्यांच्याच निवासस्थानी असायची.

त्यांच्या ज्येष्ठ भगिनी सुप्रसिद्ध समाजसेविका, कु. प्रेमा कंटक यांनी आपल्या भावाला मॅट्रीक झाल्यावर वर्धा येथील बापूजींच्या आश्रमात पाठविले. तेथे ते दोन वर्षे राहिले. इतर अनेक अनुभवाशिवाय त्यांना एकदा बापुजींबरोबर रेल्वेने प्रवास करण्याची अप्रुप संधी मिळाली होती. वर्धा येथे असल्यापासून त्यांनी अखेरपर्यंत खादीचेच कपडे वापरले.

वर्धा आश्रमात 'बजाज ग्रुप'चे संस्थापक कै. जमनालाल बजाज यांचे वास्तव्य होते. त्यांना कंटक यांचा मनमिळाऊ स्वभाव फार आवडायचा. बजाज यांनी कंटक यांना आपल्या कंपनीत यावे म्हणून आग्रह केला. ती कंपनी म्हणजे 'मे. मुकुंद आयर्न अँड स्टील वर्क्स'. तेथे त्यांना सेक्रेटरी हा महत्त्वाचा हुद्दा मिळाला. त्याच कंपनीत तेव्हां रामजीभाई कमानी हे कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर होते. कंटक यांनी मुकुंदमध्ये सहा वर्षे काम केल्यावर कमानीने त्यांना आपल्या नवीन कंपनीत 'सेक्रेटरी' म्हणून नेमले. कुर्ला येथे जमीन घेण्यापासून सुरू झालेला संबंध निवृत्त होईपर्यंत अबाधित राहिला. नवीन कायदा येईपर्यंत ते कमानीच्या सर्वच कंपन्यांचे सेक्रेटरी होते. एका कंपनीत डायरेक्टरपदी त्यांची नियुक्ती झाली होती. कंटक यांनी बऱ्याच जणांना कमानीमध्ये व इतर कंपन्यांत ओळखपत्रे देऊन नोकऱ्या मिळवून दिल्या होत्या.

अशा या कर्तबगार व निस्पृह जगन्मित्राचे ८ ऑगस्ट १९९४ रोजी निधन झाले. ४ सप्टेंबर १९१५ हा त्यांचा जन्मदिन. यंदा त्यांच्या जन्मशताब्दीच्या प्रसंगी त्यांचे सुपुत्र अरुण व शेखर आणि कन्या सौ. स्मिता प्रकाश वागळे यांनी वडीलांच्या स्मरणार्थ वृद्धसेवानिधीसाठी प्रत्येकी ५१ हजार याप्रमाणे एकूण १ लाख ५३ हजार रुपयांची देणगी दिलेली आहे.

## श्री गणपती गायतोंडे यांच्या स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटीला ५० हजार रुपयांची देणगी

वाळकेश्वर येथे राहणारे श्री गणपती घनश्याम गायतोंडे हे मूळचे अस्नोटी या गावचे. पण जामनगर हीच त्यांची कर्मभूमी झाली. तेथील जामनगर वुलन मिल्सचे ते चीफ इंजिनियर होते. १८ ऑक्टोबर २०१३ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांचे सुपुत्र डॉ. सतीश यांनी अलीकडेच वडिलांच्या स्मरणार्थ एज्युकेशन सोसायटीला ५० हजार रुपयांची देणगी दिलेली आहे.

## श्री विश्वनाथ वागळे यांच्या ५० व्या पुण्यतिथीप्रसंगी वृद्धसेवानिधीसाठी ५० हजार रुपयांची देणगी

श्री विश्वनाथ मंजुनाथ (जिवमाम) वागळे हे वनखात्यात मोठ्या हुद्यावर होते. ५० वर्षांपूर्वी हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने त्यांचे तरुण वयातच अकस्मात निधन झाले. त्यांच्या ५० व्या पुण्यतिथी प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ त्यांची कन्या श्रीमती लक्ष्मी व जामात श्री. सुधीर (अविनाश) बाबुराव नाडकर्णी यांनी वृद्धसेवा निधीसाठी ५० हजार रुपयांची देणगी दिलेली आहे. श्री नाडकर्णी यांनी दिवंगत वागळे संबंधी लिहिलेला एक लेख याच अंकात अन्यत्र छापलेला आहे.

## श्रीमती सुमन वागळे यांजकडून संघाला आणखी पन्नास हजार रुपयांची देणगी

पुणे येथील श्री. रुद्रा रामचंद्र वागळे यांचे सहा वर्षांपूर्वी निधन झाले. त्यांच्या सुविद्य पत्नी श्रीमती सुमन वागळे या दरवर्षी पतीच्या पुण्यतिथी प्रसंगी संघाला पतीच्या स्मृतीप्रीत्यर्थ

देणगी देतात. यंदाही त्यांनी समाजसेवानिधीसाठी पन्नास हजार रुपयांची देणगी पाठविलेली आहे. पतीच्या स्मरणार्थ त्यांनी दिलेल्या देणग्यांची एकूण रक्कम चार लाख रुपये एवढी आहे.

**संघास मिळालेल्या देणग्या**

| | | |
|---|---|---|
| १ | श्रीमती इंदिरा व श्री. शंकर सदाशिव वागळे ह्यांच्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. किशोर यांजकडून | १,००० |
| २ | श्री घनश्याम गोपाल वर्टी यांच्या ८३ व्या वाढदिवसाच्याप्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकर यांजकडून | १,५०१ |
| ३ | श्री. व्ही. टी. यार्दी चॅरिटेबल ट्रस्टकडून | १,५६२ |
| ४ | सविता सबनीस फाउंडेशन तर्फे खालील व्यक्तींच्या स्मरणार्थ | |
| | श्रीमती स्नेहलता (चंपू) व श्री वासुदेव गजानन सबनीस | २,५०१ |
| | श्रीमती सविता किशोर सबनीस | २,५०१ |
| ५ | श्री गजानन अंबाजी बोरकर यांच्या जन्मशताब्दीनिमित्त अनामिकेकडून | १,००१ |
| ६ | श्रीमती शैलजा देवीदास बोरकर यांच्या वाढदिवसानिमित्त कन्या श्रीमती सुनीता यांजकडून | ५,००० |
| ७ | हितचिंतकाकडून खालील व्यक्तींच्या गौरवाप्रीत्यर्थ | |
| | श्री दत्तात्रय नागेश नाडकर्णी यांच्या मुखपत्रिकेच्या योगदानाबद्दल | ५,००० |
| | श्रीमती मृदुला भांडारकर यांनी संघात व एज्यु. सोसायटीत गेली २५ वर्षे निरलसपणे सेवा केल्याबद्दल | ५,००० |
| ८ | श्री रुद्रा रामचंद्र वागळे यांच्या ६ व्या पुण्यतिथीप्रसंगी पत्नी श्रीमती सुमन यांजकडून | ५०,००० |
| ९ | श्रीमती सुधालक्ष्मी व श्री अनंत (मधुकर) दत्ताराम आंबे यांच्यातर्फे संघाच्या समाजसेवेच्या कार्याचे कौतुक या भावनेने | २१,००,००० |

**वैद्यकीय साहाय्याप्रीत्यर्थ**

| | | |
|---|---|---|
| १ | श्रीमती प्रमिला व श्री. शामराव मंगेश पिंगे यांच्या पुण्यतिथी निमित्त पुत्र श्री. मंगेश यांजकडून | २,००१ |
| २ | श्रीमती स्नेहलता गोविंद कसबेकर यांच्या पहिल्या पुण्यतिथीनिमित्त पुत्र श्री. विनय यांजकडून | ५,००० |
| ३ | श्री. अनिल भालचंद्र तेलंग यांच्या १२ व्या पुण्यतिथीनमित्त पुत्र श्री. पराग यांजकडून | २०,००० |

## वृद्धसेवा निधीसाठी


| | | |
|---|---|---|
| १ | श्री. गजानन सीताराम बोरकर यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती विमल यांजकडून | ५,००० |
| २ | डॉ. रवीन्द्र सुकथनकर यांच्या पहिल्या पुण्यतिथी निमित्त मेहुणी श्रीमती कमल गोपीनाथ वाघ यांजकडून | ५,००० |
| ३ | श्री देवीदास दत्तात्रय कुलकर्णी यांच्या स्मरणार्थ बहीण श्रीमती हेमलता सुरेश दास्ताने यांजकडून कृतज्ञतापूर्वक | ६०,००० |
| ४ | श्री मंगेश रुद्रा पालेकर यांच्या ८व्या पुण्यतिथीनिमित्त बहीण श्रीमती सुजाता सुब्राय वागळे यांजकडून | ५,००० |
| ५ | श्रीमती राधाबाई (सुंदरी) सर्वोत्तम कुलकर्णी यांच्या जन्मशताब्दीनिमित्त त्यांच्या तीन कन्यांकडून | १५,००० |
| ६ | श्रीमती इंदिरा मंगेश नाडकर्णी यांच्या स्मरणार्थ स्नुषा श्रीमती वंदना प्रमोद नाडकर्णी यांजकडून | ५,००० |
| ७ | श्री रमाकांत शामराव कंटक ह्यांच्या जन्मशताब्दीनिमित्त पुत्र सर्वश्री अरुण व शेखर व कन्या श्रीमती स्मिता प्रकाश वागळे यांजकडून | १,५३,००० |
| ८ | श्री विश्वनाथ मंजुनाथ वागळे यांच्या ५० व्या पुण्यतिथी निमित्त कन्या श्रीमती लक्ष्मी व जामात श्री सुधीर (अविनाश) बाबुराव नाडकर्णी यांजकडून | ५०,००० |

## एज्युकेशन सोसायटीस मिळालेल्या देणग्या

| | | |
|---|---|---|
| १ | श्रीमती उषा वासुदेव गायतोंडे यांच्या स्मरणार्थ पती श्री. वासुदेव शांताराम गायतोंडे यांजकडून | १०,००० |
| २ | श्री घनश्याम गोपाल वर्टी यांच्या ८३व्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ कन्या श्रीमती सीमा अजय शेंबेकर यांजकडून | १,५०१ |
| ३ | श्री व्ही. टी. यार्दी चॅरिटेबल ट्रस्टकडून | १,४३८ |
| ४ | श्रीमती संपदा भास्कर नाडकर्णी यांजकडून कृतज्ञतापूर्वक | १,००१ |
| ५ | श्री भालचंद्र विनायक पालेकर यांच्या २२व्या पुण्यतिथीनिमित्त पत्नी श्रीमती ताराबाई यांजकडून | २५,००० |
| ६ | श्रीमती लक्ष्मीबाई व वकील श्री. वैकुंठराव नीलकुंद यांच्या स्मरणार्थ | |
| | श्रीमती सुशीला व श्री नागेन्द्रनाथ वै. नीलकुंद यांच्यातर्फे | १,००,००० |
| | श्रीमती आशाबाई व श्री. बाळगंगाधर वै. नीलकुंद यांच्यातर्फे | १,००,००० |
| ७ | श्रीमती रंजिता राजन वागळे यांजकडून | १०,००० |
| ८ | श्री. मोहन मंगेश वाघ यांच्या वाढदिवसाच्या प्रसंगी त्यांच्या स्मरणार्थ पत्नी श्रीमती मेहरू व कन्या श्रीमती मनीषा यांजकडून | ११,००० |
| ९ | श्री. गणपती घनश्याम गायतोंडे यांच्या स्मरणार्थ पुत्र डॉ. सतीश यांजकडून | ५०,००० |

(ऊर्वरीत देणग्यांचा तपशील जागेअभावी पुढील अंकी)

Regd. with Registrar of Newspapers of India under Reg. No. RN37436/80




हे पत्र संपादक, मुद्रक, प्रकाशक द. ना. नाडकर्णी यांनी
दि नॉ. कॅ. गौ. सा. ब्रा. संघ, मुंबई ४, यांच्यासाठी प्रसिद्ध केले.